विशेष लेख क्र. १८

२३ माघ १९२८ शके (सायं.५.३० वा.)
सोमवार, दि. १२ फेब्रुवारी, २००७

# औष्णिक ऊर्जा प्रकल्प : कोकणाची सुखसमृद्धीकडे वाटचाल

सुमारे २०,००० कोटीचा औष्णिक ऊर्जा प्रकल्प कोकणच्या विकासासाठी येऊ घातला आहे. सिंधुदुर्गाच्या विकासाचा सकारात्मक विचार करणारे म्हणतात की, या प्रकल्पामुळे येणाऱ्या आपत्तीबाबत संशोधनपूर्ण अभ्यास व्हावा व जर आपत्ती येणार नसतील तर प्रकल्प स्विकारायला काही हरकत नाही. तर नकारात्मक दृष्टीकोनातून या प्रकल्पाच्या रुपाने येऊ घातलेल्या कोकण विकासाला 'काही झाले तरी प्रकल्प होऊ देणार नाही' अशी भूमिका काहीजण मांडताना दिसत आहेत.

कोकणच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले जिल्ह्याचे पालकमंत्री नारायणराव राणे यांनी आतापर्यंत अनेक विकास कामे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत. आता तर त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या देवगड तालुक्यात औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणण्याचा संकल्प केला आहे. केंद्रीय ऊर्जामंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्याशी चर्चा झाल्यावरच हा प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पामुळे सुमारे सहा हजार लोकांना नोकरीची संधी उपलब्ध होईल. तसेच या प्रकल्पाच्या निमित्ताने लोकांना अनेक जोडधंदेही उभारण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. देवगड-कोल्हापूर लोहमार्ग सुरु होऊ शकतो. पर्यटन व्यवसायात लोकांना फायदा मिळू शकतो. परंतु.............

या औष्णिक प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीचे काय ? हे जनतेसमोर, शेतकऱ्यांसमोर एक मोठे प्रश्नचिन्ह उभे राहीले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्याला रमणीय अशी किनारपट्टी लाभलेली आहे. यास किनारपट्टीवर वसलेल्या गिर्ये-सौंदाळे दरम्यान हा प्रकल्प उभारला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कोकण हा आंबा, फणस, काजू, रातांबे अशा अनेक फळबागायतींचा प्रदेश आहे. त्यात देवगडचा हापूस आंबा तर जगात प्रसिद्ध आहे. देवगडला लाभलेल्या समुद्र किनाऱ्यावर मच्छीमारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. आंबा बागायती आणि मच्छीमारीवर जवळ जवळ संपूर्ण तालुक्याचे जीवनव्यवहार चालत असतात. या औष्णिक ऊर्जा प्रकल्पामुळे होणाऱ्या जलप्रदूषण आणि वायूप्रदूषणाचे परिणाम काय होतील हा सर्व जनतेला आणि शेतकऱ्यांना काळजीत टाकणारा प्रश्न आहे.

त्यामुळे या प्रकल्पाला होत असलेला विरोध लक्षात घेऊन जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी मुंबई येथे एका बैठकीचे अलीकडेच आयोजन केले होते. याकरिता देवगड तालुक्यातून आंबा बागायतदारांच्या समन्वय समितीच्या सुमारे २१, २२ लोकांचा चमू या बैठकीस उपस्थित होता. खुद्द महसूलमंत्री नारायणराव राणे व जी थर्मल कंपनी हा औष्णिक ऊर्जा प्रकल्प घेऊन येत आहेत तिचे अधिकारी यांच्या समवेत सर्वांगीण विचारविनियम झाला. या बैठकीला एक आंबा बागायतदार शेतकरी म्हणून मी उपस्थित होतो. यावेळी या प्रकल्पाबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती पुढीलप्रमाणे होती.

हा प्रकल्प अत्याधुनिक स्वरुपाचा आहे. या प्रकल्पात वीज निर्मितीसाठी जो कोळसा वापरला जाणार आहे, तो भारतीय कोळसा नसेल. कारण हा कोळसा जळल्यावर त्याची ३० ते ४० टक्के राख शिल्लक राहते. परदेशातून कोळसा आयात केला जाईल. या कोळशाची राख केवळ ८ ते १० टक्केच पडते.

..२/-

शिवाय ही राखही सिमेंटसाठी, इमारती बांधताना व वीज निर्मितीसाठी उपयोगी पडते त्यामुळे प्रस्थापित निसर्गावर प्रदुषणाचा कोणताही परिणाम होणार नाही. फळबागायती व प्राणी सृष्टीवरही या प्रकल्पाचा परिणाम होणार नाही.

थर्मल कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ही माहिती दिल्यानंतर 'एका बाजूला कोकणचा विकास तर झालाच पाहिजे पण त्याचवेळी कोकणवासियांना कुठल्याही आपत्तीला तोंड द्यायला लागू नये याची दक्षता' म्हणून या प्रकल्पाच्या विधायक-विघातक परिणामांचा अभ्यास करण्यासाठी येत्या दोन वर्षात वेगवेगळ्या एजन्सीजकडून या प्रकल्पासंबंधी संशोधनात्मक अभ्यास करुन घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल, असे नारायण राणे यांनी स्पष्ट केले. सरकार करीत असलेल्या या संशोधनावर जर देवगड तालुक्यातील आंबा बागायतदारांची हरकत असेल तर शेतकरी संघटनेच्या माध्यमातून एक समांतर समिती नेमून संशोधन करुन घ्यावे व जर या प्रकल्पामुळे निसर्ग हानी होऊन लोकांच्या शेती उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम होणार असेल, तर या प्रकल्पाला आपण स्वीकारणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चेदरम्यान मी स्वतः या प्रकल्पामुळे निर्माण होणारा सुमारे सहा हजार लोकांचा रोजगार, इथल्या स्थानिक सुशिक्षित तरुणांना मिळाला पाहिजे व त्यासाठी औष्णिक ऊर्जा प्रकल्पाशी संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या समांतर इन्स्टिट्यूट निर्माण केल्या पाहिजेत अशी मागणी केली. भले काही संभाव्य नैसर्गिक प्रदुषणामुळे थर्मल कंपनीचा हा प्रकल्प बारगळला, तरी या संस्थेमधून प्रशिक्षण घेऊन तयार झालेल्या तरुणांना अन्यत्र सेवेच्या संधीही उपलब्ध होऊ शकतील. हे होणार असेल तर ठिक अन्यथा कोकणच्या तरुणांना त्या कारखान्यात हमालीची, लोडरची कामे करण्याची पाळी येईल, याचा गांभिर्याने विचार करुन तशी व्यवस्था केली पाहिजे, अशी मागणी केली.

तसेच हा औष्णिक ऊर्जा प्रकल्प गिर्ये-सौंदाळे या दरम्यान निर्माण करण्याचे जरी प्रास्तावित असेल तरी काही गांवे उठऊन त्यांचे पुनर्वसन करणे ही गोष्ट अत्यंत कठीण आहे. त्यामुळे गावे न उठवता, वस्त्या न हलविता प्रकल्पाचे स्थान खारेपाटणकडील बाजूला सरकविले तर चालू शकेल, असा मी प्रस्ताव मांडला व तो मान्यही झाला आहे.

या समितीच्या संशोधन अहवालावर कोकणच्या पुढील विकासाची वाटचाल अवलंबून असणार आहे. अजून बाजारात तुरी आणि ...... अशी आमची गत व्हायला लागली आहे. खरचं या प्रकल्पामुळे काही नैसर्गिक आपत्ती येणार असतील तर आंबा बागायतदार शेतकरी म्हणून मी ही एक प्रकल्पग्रस्त होणारच आहे. पण देवगडच्या विकासाबाबत दैव देते आणि कर्म नेते असे होऊ नये असे वाटते.

सर्वप्रथम जनतेचे आंबा बागायतदारांचे, शेतकऱ्यांचे आणि विशेषतः मच्छिमारांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही, ह्याची दक्षता घेत, या प्रकल्पाबाबत आपणाला विचार करायला हवा.

रत्नागिरी जिल्ह्यातील एन्रॉन प्रकल्पाला सुरुवातीला जनतेने असाच विरोध केला होता. पण आज त्या भागाचा विकास मोठ्या प्रमाणात होतांना दिसत आहे. तेव्हा गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्राच्या विकास गंगेने आपला प्रवाह कोकणाकडे वळविला आहे, याचा लाभ घेऊन आपण सर्वजण सुखसमृद्धीकडे वाटचाल करुया, मात्र सावधगिरीने !

**- सत्यवान जामसंडेकर**

०००